# बी. रघुनाथांच्या कवितेतील समाजचिंतन

**देगलूरकर शरदचंद्र एकनाथ**
(मराठी विभाग) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड

बी. रघुनाथांनी कविता, कथा, कांदबरी, लघु निबंध इ. वाङःमयप्रकारांमधुन लेखन केले. रसपूर्णता, भावपूर्णता, आल्हादकारकता हे कवित्वाच्या दृष्टीने महत्वाचे असलेले गुण बी. रघुनाथांच्या कवितेत असल्यामुळे तिचे कवितापण निर्विवाद आहेच, साहित्य व काव्य या वाङःमयीन दृष्टीने बी. रघुनाथांच्या साहित्यनिर्मितीचा विचार होत असतांही. परंतु समाजनिष्ठ हे बी. रघुनाथांच्या कथावाङःमयाचे व कवितेचे एक वैशिष्टय आढळते. त्यामुळे सामाजिक दृष्टीने त्यांच्या काही कवितांचा विचार सामाजिक दृष्टीने त्यांच्या काही कवितांचा विचार करणे अगत्याचे ठरेल.

कवितेच्या समाजापयोगित्वाची मीमांसा करणे म्हणजे एका दृष्टीने काव्यातील भावतत्यो प्राधान्य नाकारणेच होय. 'कांतासाम्मित उपदेश' म्हणजे प्रेमळ पत्नीने केलेला उपदेश, असे काव्यांचे एक प्रयोजन काव्यतत्वाला बाधक ठरु नये म्हणून कवितेपासून प्राप्त होणाऱ्या आल्हादाचा विशेषत्वाने उल्लेख मम्मटाने आपल्या काव्य प्रयोजन विचारात केलेला आहे. कांततेपासून आनंद, आल्हाद प्राप्त होणे कवितेचे प्रधान तत्व असल्यामुळे 'रस हाच काव्याचा आत्मा' मानणारी विश्वनाथाची व्याख्या भारतीय साहित्य विचारात मान्यता पावलेली आहे. त्यातही अशा रसपूर्ण, आनंददायक, आल्हादकारक कवितेव्दारे सदाचाराची, समाजसौख्याची शिकवण मिळत असेल तर त्या कवितेची योग्यता निश्चितच दुगावत असते तर त्यामुळे कवितेच्या सामाजिक उपयुक्ततेची मीमांसा ही कवितेव्दारे प्रापत होणाऱ्या उच्च मानसिक आनंदाची महती मान्य करुन, कवितेच्या समाजहित कारकतेचे स्वरुप स्पष्ट करीत असते.

ग्रामीण जीवनातील श्रृगांराचे, प्रेमाचया नाजूक बंधाचे, ग्रामीण स्त्रीच्या सौंदर्याचे, विरहाचे व कुटुंबवत्सलतेचे सहकंप बी. रघुनाथांच्या कवितेत अभिव्यक्त होतात. कवितेततील सौंदर्यपूर्णता, लयबध्दता, रसात्मता यांचे दर्शन या कवितांमधून घडते, त्याचप्रमाणे बी. रघुनाथांच्या कवितेमागे असलेली सव्दिचारांची शक्ती, तिचे सामाजिक दृष्टीने असलेले महत्वही अधोरेखित करणे. कारण जीवनाचा अर्थ आणि जीवनातील मूल्ये यांच्यावर उच्च दर्जाच्या कवितेचा ठसा उमटत असतो.

विवेक शक्तीच्या बळावर चिरंतन आणि प्रमादरहित जीवनमूल्यांची प्रतिष्ठा वाढवणे, त्या जीवनमूल्यांचा सत्कार व स्वीकार करणे हे कार्य अशा प्रकारच्या कवितेकडून होत असते. मानवी जीवन अधिकाधिक शुध्द करणे, जीवनाचा विछंस करणाऱ्या पाशवी शक्ती नष्ट करणे हे अशा कवितेतील नितिविचाराचे ध्येय असते. मानवी जीवनातील चांगले-वाईट प्रमादपूर्ण प्रमादरहित, त्याज्य-स्वीकार्य यांच्यातील अंत स्पष्ट करण्याचे कार्य श्रेष्ठ दर्जाची कविता करत असते. सदगुणांची आवड निर्माण करणे, नैतिक मूल्यांचे महत्व प्रतिपादन करणे यासोबतच दुर्गुणांचा तिटकाराव अनीतीची त्याज्यता या शिकवणही अशी कविता देत असते.

यादृष्टीने बी. रघुनाथांच्या कवितेतील सामाजिक आशयाच्या कविता लक्षणीय आहेत. त्यांची पश्चिमे तुझे नभ---! ही कविता पाश्चात्यांच्या भोगवाही संस्कृतीचे पितळ उघडे करणारी आहे. भेगवादाच्या, चंगळवादाच्या आहारी जाऊन पदार्थजन्य भोगातच सुख मानणऱ्यांना त्यागमय जीवनाचा आदर्श जगासमोर ठेवणाऱ्या पूर्वेचे तेज कसे सळकेल याचे वर्णन कवीन केले आहे.

विध्वंसाची मुखि मुखचूर्णे
ओठावरती रक्त रोगणे
प्रसाधनी या उन्मादाने

चुंबिकेस हळुहळु कोवळे रक्त त्यांचे साकळले अशी पश्चिमेची विध्वंसकता व तिच्या प्रतिसुखातही असलेली वासनांधता कवीने रेखाटली आहे. पश्चिमेच्या भौतिकते निषेध करतांना कवीने 'वृथा धुक्याने पांघरशी थर' अशी प्रतिमा वापरली आहे.

मानवी जीवनात निर्माण होणारी दुःखे होणारी दुःखे ही प्रामुख्याने तृष्णामूलक असतात म्हणून तृष्णा भयंकरच आहे असे कवीला वाटते.

या जगताची तृष्णा भयंकर
या जगताची नशा भयंकर
हवे जगाला धर्मतत्वही
गाळ अधर्मातला लुटाया
----------------------
या जगताला हवे महात्मे

गोळया घालुन मारायाला.

असे या जगातील भयंकर तृष्णेचे दाहक वास्तव बी. रघुनाथांनी अभिव्यक्त केले आहे.

'आंधळी' या कवितेत, व्यक्तिजीवनात व समाजजीवनात सामर्थ्य व तेच निर्माण करणाऱ्या जीवनमूल्यांचा उद्‌घाटन कवीने केला आहे. समाजजीवनाची नैतिक हानी करणारी एक शक्ती म्हणजे नेतृत्व सामाजिक अधःपाताला कारणीभूत असते. अशा नेतृत्वाला समाजातील सुचरित, सुंदर, चांग दिसत नसते, हेच या नेतृत्वाचे आंधळेपण कवीने 'आंधळी' या कवितेत व्यक्त केले आहे.

सर्वच क्षेत्रात वाढलेला ढोंगीपणा कवीला व्यथित करतो. बोलण्याप्रमाणे वर्तन, प्रथम कृति करुन नंतर उपदेश या गोष्टी धारणेत अत्यंत महत्वाच्या असतात. समाजावर कृतिनिष्ठ विचारांचा प्रभाव पडू शकतो ही जाणीव कवीला आहे. त्यामुळेच स्वतःच्या तत्वाप्रमाणे वागणारे कृतिशील महात्मे आज दिसत नाहीत ही खंत कवीने आज कुणाला गावे या कवितेत व्यक्त आहे.

एकूणच समकालीन सामाजिक वास्तवाचे भान ठेऊन समाजातील अनिष्ठांवर प्रहार करणारी प्रेरणा बी. रघुनाथांच्या समाजचिंतनपर कवितेमध्ये दिसून येते.